Impact Factor 4.574

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Journal

VOL-V ISSUE-V May 2018

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

बंजारा जमातीचे आर्थिक बाबींच्या संदर्भात परिवर्तन – एक समाजशास्त्रीय अध्ययन

प्रा. संजय विठ्ठलराव चव्हाण
विभाग प्रमुख
राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालय, कुही, जि. नागपूर

प्रा. डॉ. अश्रू पुंजाजी जाधव
प्राचार्य
जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ

१.० प्रस्तावना

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. या देशातील इंग्रजांची सत्ता संपुष्टात आली. इंग्रज भारतातून निघून गेले. मात्र भटक्या विमुक्तांच्या संदर्भात त्यांनी निर्माण केलेले कायदे देशातच राहिले. स्वतंत्र भारतातील लोक भटक्या विमुक्तांकडे इंग्रजांच्या दृष्टीकोनातूनच पहात राहिले. स्वातंत्र्योत्तर काळातही त्यांच्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन कायम राहिला. देश स्वतंत्र झाला, पण देशातील भटके–विमुक्त स्वतंत्र झाले नाहीत, स्वातंत्र्यातही त्यांची उपेक्षा झाली. भारतातील संपूर्ण सामाजिक परिर्वतनाच्या प्रक्रियेत 'जात' हा घटक फार मोठा अडथळा ठरला आहे. विशेषत: पूर्वीच्या आणि प्रचलित काळातील विविध धर्मांचे व जातींचे पारंपारीक जगणे, जाती धर्माचा चालीरीती, अहंकार, जगण्यातील परावलंबित्व जातींचे पारंपरिक व्यवसाय, समाजातील पराकोटीचे दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रध्दा व धार्मिक बंधने मुख्य म्हणजे त्याविरूध्द बंड करण्याचा अभाव. या कारणांनी जातीवाद व रूढी पिढयान्पिढया टिकून राहण्यास वाव मिळाला आहे. परंतु, भारतातील धार्मिक विषमता, जातीप्रथा, अंधश्रध्दा आणि अन्याय अत्याचाराविरूध्द व मानवी मूलभूत हक्क मिळविण्यासाठी देशात अनेक छोटया मोठया चळवळी विविध क्षेत्रात उभ्या राहू शकल्या. त्याचा परिणाम स्वातंत्र्योत्तर काळात भटक्या विमुक्त जाती जमाती जागृत होण्यात झाला.

परिणामी या समाजातील, शिक्षित पिढीने नव्या जाणीवा अंगिकारल्या. विशेषत: तरूणांना प्रथम लेखणीच्या माध्यमातून भटक्या विमुक्तांच्या जगण्याला वाचा फोडणाऱ्या आणि सामाजिक व धार्मिक अन्याय अत्याचाराविरूध्द व एकूणच समाज व्यवस्थेविरूध्द लिहिणाऱ्या, बोलणाऱ्या अनेक लेखक, कार्यकर्त्यांचा वर्ग निर्माण होऊ शकला. सामाजिक परिवर्तन हा व्यापक सांस्कृतिक परिवर्तनाचा एक भाग असतो कला, भाषा, विज्ञान, तंत्रज्ञान, तत्वज्ञान या सर्व व्यक्त–अव्यक्त सांस्कृतिक घटकांमध्ये होणाऱ्या बदलांचे परिणाम सामाजिक जीवनावर घडत असले, तरी त्या सर्वांचा अंतर्भाव सामाजिक परिर्वतन या संज्ञेत होत नाही. समाजाच्या संरचनेत व कार्यात ज्या बदलांमुळे फेर–फार होतात, तेच फक्त सामाजिक परिवर्तन म्हणावयास पात्र असतात. व्यक्ती–व्यक्तींच्या आंतरसंबंधाची चौकट म्हणजे सामाजिक संरचना. मानवी संबंधाचे ती केंद्र असल्याने मानवी जीवनस्थितीइतकीच तीही परिवर्तनीय असते.

प्रस्तुत अध्ययन बंजारा जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन व त्यांच्या एकंदरीत विकासाचे समाजशास्त्रीय महत्त्व काय आहे, याविषयी संशोधन करून बंजारा जमातीचा विकास कशा प्रकारे करता येईल याकरिता अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करणे आवश्यक होते. सर्व जमातींप्रमाणे बंजारा जमात ही देखील राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. या संपत्तीचे जतन राष्ट्राने करणे अनिवार्य आहे. त्यामुळे बंजारा जमातीच्या अध्ययनास महत्त्व आहे. बंजारा जमातीचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने त्यांच्या

सामाजिक, आर्थिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक व सामाजिक क्षमतांचा योग्य प्रकारे विकास घडवून आणणे महत्त्वाचे आहे. यापैकी कुठलीही क्षमता जर विकसित झाली नाही तर बंजारा जमातीच्या एकंदरीत विकासात अनेक दोष निर्माण होऊन भविष्यात त्याचे विपरीत परिणाम होऊ शकतात. कोण्त्याही जमातीच्या विविध गरजा पूर्ण होणे किंवा न होणे मुख्यत: शासकिय व गैर शासकिय प्रयत्नांवर तसेच सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. पिढयान्पिढया अंधारात चाचपडण्याऱ्या आपल्या भारतीय भाईबंधांचे, पर्यायाने भटक्या विमुक्तांचे पालावरचे जग उजेडात आणण्यासाठी सर्वांनीच प्रामाणिकपणे प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. या गरजेचा काही अंशी प्रयत्न व्हावा या उद्देशाने प्रस्तुत अध्ययनात आर्थिक बाबींच्या संदर्भात बंजारा जमातीचे सामाजिक परिवर्तन या विषयाची निवड केली आहे.

२.० संशोधन प्रक्रिया

प्रस्तुत संशोधनात वाशिम जिल्ह्यातील बंजारा जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन करावयाचे असल्याने सामाजिक सर्वेक्षण पदधतीची निवड केलेली आहे. एकंदरीत सर्वेक्षण पदधतीचे महत्व लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधनात वाशिम जिल्ह्यातील बंजारा जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन केलेले आहे.

२.१ संशोधनाचे कार्यक्षेत्र : प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधन क्षेत्र म्हणुन वाशिम जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे.

२.२: जनसंख्या आणि न्यादर्श :–

प्रस्तुत संशोधनात वाशिम जिल्ह्यातील संपूर्ण बंजारा समाजाला जनसंख्या म्हणून गृहित धरण्यात आले आहे. प्रस्तुत संशोधनकार्यात वाशिम जिल्ह्यातील एकुण सहा तालुक्यातील (कारंजा, मंगरूळपीर, मनोरा, मालेगाव, वाशिम व रिसोड) प्रत्येकी ५० बंजारा नागरिकांची असे एकुण ३०० बंजारा नागरिकांची निवड उद्देश्यपुर्ण यादृच्छिक पद्धतीने (Purposive Random Sampling Method) करण्यात आली.

२.३ संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अशा मिश्र संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली आहे.

२.४ तथ्य संकलन पद्धती

प्रस्तुत संशोधन हे दोन भागामध्ये विभागण्यात आले आहे. प्राथमिक स्त्रोताद्वारे (प्रश्नावली/मुलाखत अनुसुचीद्वारे) माहिती प्राप्त करुन निष्कर्ष काढणे तसेच उपलब्ध दुय्यम स्त्रोतामधून प्राप्त झालेल्या माहितीला सकंलीत करुन त्यातील तथ्ये संशोधनाच्या पाहणीला प्रमाणभूत करण्यासाठी वापरण्यात आले. अशा प्रकारे संशोधन कार्य प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोत हया दोन्हीचा उपयोग करुन पूर्ण करण्यात आला.

२.५ सांख्यकिय विश्लेषण

प्रस्तुत संशोधनकार्यात प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन करुन आलेख, विवेचन व पृथ:करण व सांख्यकिय विश्लेषण करण्यात आले. प्राप्त माहितीवरुन वारंवारीता (Frequency) व बहुलक (Mode) काढण्यात आले. त्याचप्रमाणे माहितीच्या विश्लेषणाकरीता 'Chi-Square' test चा वापर करण्यात आला. Significance Level 0.05 निर्धारीत करण्यात आली.

३.० तथ्यांचे विश्लेषण आणि अर्थ शोधण

३.१ बंजारा समाजात कुटुंबप्रमुख ठरविण्याचे निकष

सारणी क्र. १: कुटुंबप्रमुख निकष दर्शक सारणी

कुटुंबप्रमुख ठरविण्याचे निकष	उत्तरदात्यांची संख्या	टक्केवारी
वयस्कर म्हणून	६	२%
पुरूष म्हणून	२४	८%
कमावता म्हणून	९१	३०%
शिक्षित म्हणून	४	१%
अनुभवी व वयाने मोठा म्हणून	१७५	५८%
एकूण	**३००**	**१००%**

काई वर्ग मूल्य:– ३५८.९, **स्वातंत्र्यांश** – ४, **तालिका मूल्य:**–९.४९, **P मूल्य:**–<0.05

वरील सारणी क्र. १ मध्ये बंजारा नागरिकांच्या कुटुंबातील कुटुंब प्रमुख ठरविण्याच्या निकषासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ५८ टक्के बंजारा नागरिकांच्या मते कुटुंब प्रमुख ठरवितांना अनुभव व वय विचारात घेण्यात येत असून ३० टक्के बंजारा नागरिकांच्या मते कुटुंबात कमावता असल्यामुळे कुटुंब प्रमुख ठरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे पुरूष म्हणून, वयस्कर म्हणून व शिक्षित म्हणून कुटुंबप्रमुख ठरविण्यात येतो हे नमूद करणाऱ्या बंजारा नागरिकांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ८ टक्के, २ टक्के व १ टक्के असल्याचे आढळले.

३.२ बंजारा समाजात कौटुंबिक खर्च निर्णय

सारणी क्र. २: कौटुंबिक खर्च निर्णय दर्शक सारणी

कुटुंबातील सर्व साधारण खर्चासंबंधीचा निर्णय	उत्तरदात्यांची संख्या	टक्केवारी
स्वत:	३८	१३%
पती पत्नी दोघेही	१७६	५९%
वडीलधारी मंडळी	८६	२९%
एकूण	**३००**	**१००%**

काई वर्ग मूल्य:– ९८.१६, **स्वातंत्र्यांश** – २, **तालिका मूल्य:**–५.९९, **P मूल्य:**–<0.05

वरील सारणी क्र. २ मध्ये कुटुंबातील सर्व साधारण खर्चाचा निर्णय घेणाऱ्या व्यक्तिसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ५९ टक्के बंजारा नागरिकांच्या कुटुंबात सर्व साधारण खर्चाचा निर्णय पती–पत्नी दोघेही घेत असून, २९ टक्के बंजारा नागरिकांच्या कुटुंबात सर्व साधारण खर्चाचा निर्णय वडीलधारी मंडळी घेत असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे कुटूंबातील सर्व साधारण खर्चाचा निर्णय स्वत: घेणाऱ्या बंजारा नागरिकांचे शेकडा प्रमाण १३ टक्के असल्याचे आढळले.

३.३ उत्तरदात्यांचे कौंटुंबिक मासिक उत्पन्न

सारणी क्र. ३: कौंटुंबिक मासिक उत्पन्न दर्शक सारणी

मासीक उत्पन्न	उत्तरदात्यांची संख्या	टक्केवारी
रू. ५,०००/– पेक्षा कमी	१७७	५९%
रू. ५,००१ ते १५,०००/–	८४	२८%
रू. १५,००१ ते रू. ३०,०००/–	३९	१३%
एकूण	३००	१००%

काई वर्ग मूल्य:– ९९.०६, **स्वातंत्र्यांश** – २, **तालिका मूल्य:**–५.९९, **P मूल्य:**–<0.05

वरील सारणी क्र. ३ मध्ये दर्शविलेल्या माहितीनुसार ५९ टक्के बंजारा नागरिकांच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न रू. ५०००/– पेक्षा कमी असून रू. ५००१ ते १५०००/– मासिक उत्पन्न असणाऱ्या बंजारा नागरिकांचे शेकडा प्रमाण २८ टक्के असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १३ टक्के बंजारा नागरिकांच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न रू. १५००१/– ते रू. ३००००/– दरम्यान असल्याचे निदर्शनास आले.

३.४ कुटुंबातील कमविणारे सदस्य

सारणी क्र. ४: कुटुंबात कमविणाऱ्या सदस्यांची संख्या दर्शक सारणी

कुटुंबातील कमविणारे एकूण सदस्य	उत्तरदात्यांची संख्या	टक्केवारी
एक	२१३	७१%
दोन	६६	२२%
तीन	१२	४%
चार	६	२%
चार पेक्षा अधिक	३	१%
एकूण	३००	१००%

काई वर्ग मूल्य:– ५३१.९, **स्वातंत्र्यांश** – ४, **तालिका मूल्य:**–९.४९, **P मूल्य:**–<0.05

वरील सारणी क्र. ४ मध्ये बंजारा नागरिकांच्या कुटुंबात कमविणाऱ्या एकुण सदस्य संख्येसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ७१ टक्के बंजारा नागरिकांच्या कुटुंबात एक कमावती व्यक्ति असून २२ टक्के बंजारा नागरिकांच्या कुटुंबात दोन कमावत्या व्यक्ति असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे ४ टक्के व २ टक्के बंजारा नागरिकांच्या कुटुंबात अनुक्रमे तीन व चार कमावत्या व्यक्ती असून कुटुंबात चारपेक्षा अधिक कमावत्या व्यक्ति आहेत हे नमूद करणाऱ्या बंजारा नागरिकांचे शेकडा प्रमाण केवळ १ टक्के असल्याचे आढळले.

३.५ कुटुंबाच्या आर्थिक मिळकतीतील बदल

सारणी क्र. ५: कुटुंबातील आर्थिक मिळकतीत वाढ दर्शक सारणी

	उत्तरदात्यांची संख्या	टक्केवारी
आर्थिक मिळकतीत वाढ झाली	२४३	८१%
आर्थिक मिळकतीत वाढ झाली नाही	५७	१९%
एकूण	३००	१००%

काई वर्ग मूल्य:– ११५०३२, **स्वातंत्र्यांश** – १, **तालिका मूल्य:**– ३.८४, **P मूल्य:**–<0.05

वरील सारणी क्र. ५ मध्ये कुटुंबातील आर्थिक मिळकत वाढण्यासंबंधी बंजारा नागरिकांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ८१ टक्के बंजारा नागरिकांच्या कुटुंबातील आर्थिक मिळकत वाढली असून १९ टक्के बंजारा नागरिकांच्या कुटुंबातील आर्थिक मिळकत वाढली नसल्याचे निदर्शनास आले.

३.६ आर्थिक स्थिती सुधारण्याची कारणे

सारणी क्र. ६: आर्थिक स्थिती सुधारणा कारणे दर्शक सारणी

आर्थिक स्थिती सुधारणा कारणे	उत्तरदात्यांची संख्या	टक्केवारी
शैक्षणिक विकासामुळे समाजातील मुलांना नोकरी व इतर व्यवसाय करता आले.	६	२%
शेतीसोबत इतर जोड व्यवसाय शैक्षणिके दर्जा उंचावल्यामुळे आर्थिक दर्जा उंचावला	३९	१३%
पशुपालनासोबत शेती शैक्षणिक दर्जा उंचावल्यामुळे आर्थिक दर्जा उंचावला	२३४	७८%
नोकरीमुळे कुटुंबाच्या उत्पादनात बदल झाला	९	३%
नवीन व्यवसाय व शिक्षण	१२	४%
एकूण	३००	१००%

काई वर्ग मूल्य:– ६४२.३, **स्वातंत्र्यांश** – ४, **तालिका मूल्य:**–९.४९, **P मूल्य:**–<0.05

वरील सारणी क्र. ६ मध्ये मागील काही वर्षात बंजारा समाजाच्या आर्थिक स्थितीमध्ये झालेल्या बदलाच्या कारणांची माहिती दिली आहे. या प्रमाणे ७८ टक्के व्यक्तींच्या मते मागील काही वर्षात बंजारा समाजाच्या एकंदरीत आर्थिक स्थितीमध्ये झालेल्या सुधारणेचे कारण पशुपालनासोबत शेती व शैक्षणिक दर्जा उंचावणे हे असून १३ टक्के नागरिकांच्या मते शेती सोबत इतर जोड व्यवसाय व शैक्षणिक दर्जा उंचावल्यामुळे त्यांचा आर्थिक दर्जा उंचावला आहे. त्याचप्रमाणे मागील काही वर्षात बंजारा समाजाच्या आर्थिक सुधारणेचे कारण नवीन व्यवसाय व शिक्षण, नोकरी करत असल्यामुळे कुटुंबाच्या उत्पादनात बदल व शैक्षणिक विकासामुळे समाजातील मुलांना नोकरी व इतर व्यवसाय करता आले हे असल्याचे नमूद

करणाऱ्या बंजारा नागरिकांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ४ टक्के, ३ टक्के व २ टक्के असल्याचे निदर्शनास आले.

४.० निष्कर्ष

४.१ कुटुंबप्रमुख निकष

- प्राप्त परिणामांच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, प्रस्तुत अध्ययनात समाविष्ट बहुतांश बंजारा नागरिकांच्या मते अनुभव व वय हे घटक कुटुंब प्रमुख ठरविताना विचारात घेतले जातात.

४.२ कौंटुंबिक खर्च निर्णय

- प्राप्त परिणामांच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, प्रस्तुत अध्ययनात समाविष्ट बहुतांश बंजारा नागरिकांच्या कुटुंबात सर्व साधारण खर्चाचा निर्णय पती–पत्नी दोघेही मिळून घेतात.

४.३ कौंटुंबिक मासिक उत्पन्न

- प्राप्त परिणामांच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, प्रस्तुत अध्ययनात समाविष्ट बहुतांश बंजारा नागरिकांच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न रू. ५०००/– पेक्षा कमी आहे.

४.४ कुटुंबात कमविणाऱ्या सदस्यांची संख्या

- प्राप्त परिणामांच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, प्रस्तुत अध्ययनातील बंजारा समाजीतल लोक नोकरी, धंदा, शेती करतात. ती शेती, व्यवसाय, धंदा तो एकटाच करित असल्यामुळे घरातील इतर सदस्य त्यांना वेळोवेळी मदत करतात व आपली गुजराण करतात.

४.५ कुटुंबातील आर्थिक मिळकतीत वाढ

- प्राप्त परिणामांच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, प्रस्तुत अध्ययनात समाविष्ट बहुतांश बंजारा नागरिकांच्या कुटुंबातील आर्थिक मिळकत वाढली आहे.

४.६ आर्थिक स्थिती सुधारणा कारणे

- प्राप्त परिणामांच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, प्रस्तुत अध्ययनात समाविष्ट बहुतांश बंजारा नागरिकांच्या मते मागील काही वर्षात बंजारा समाजाच्या एकंदरीत आर्थिक स्थितीमध्ये झालेल्या सुधारणेचे कारण पशुपालनासोबत शेती व शैक्षणिक दर्जा उंचावणे हे आहे.

आधारग्रंथ सुची

1) जरारे वि., संशोधन प्रणाली, सुविधा पब्लिशर्स, ३५–ए, नटराज नगर, इमली फाटक, जयपूर, १९९५:७९
2) बोधनकर सु., अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, १९९३:२७८.
3) पाटील बळीराम हीरमन, गेरबंजारे लोकांचा इतिहास, प्रा. सुधाकर नाईक अध्यक्ष, ले. बळीराम पाटील स्मारक समिती, यवतमाळ पुनर्मुद्रण १९७३.
4) राठोड मोतीराज, गोरमाटी (मराठी), बंजारा सांस्कृतिक साहित्य परिषद, संजयनगर, औरंगाबाद.
5) चव्हाण रामनाथ, भटक्या विमुक्तांची जातपंचायत खंड:४, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, पहिली आवृत्ती २००८.
6) चव्हाण, म.ल., बंजारा बोली भाषा–एक अध्ययन, सूर्या प्रकाशन, कानपुर, प्रथमावृत्ती २००७.
7) आगलावे, प्र., सामाजिक मानवशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर २००१.